G61/BPS301/EE/20160527

वेळ : 3 तास **गुण : 80**

विद्यार्थ्यांसाठी सूचना :

1. विभाग A वस्तुनिष्ठ बहुपर्यायी प्रश्नांचा आहे. त्याची उत्तरे उत्तरपत्रिका / OMR Sheet वर नोंदवायची आहेत.

2. OMR Sheet वरील चार पर्यायांपैकी अचूक पर्यायाखालील वर्तुळ काळ्या पेनाने पूर्ण भरावे. वर्तुळ अर्धवट भरल्यास अथवा एका प्रश्नास जास्त वर्तुळ भरल्यास ते उत्तर चुकीचे समजले जाईल.



A B C D

उत्तराची अयोग्य नोंद



A B C D

उत्तराची योग्य नोंद

3. बहुपर्यायी प्रश्नांमध्ये सर्वात अचूक उत्तरे नोंदविणे अपेक्षित आहे.

4. विभाग B वस्तुनिष्ठ विनापर्यायी स्वरूपाचा आहे. त्यासाठी स्वतंत्र उत्तरपत्रिका दिली आहे.

5. विभाग C हा दीर्घोत्तरी स्वरूपाचा असून आवश्यक तेथे नकाशा व आकृत्या काढणे अपेक्षित आहे.

6. विभाग A साठी प्रत्येक चुकीच्या उत्तरासाठी 1/3 उणे गुण पद्धत लागू नाही.

7. विभाग B आणि C विभाग साठी उणे गुण पद्धत लागू नाही.

SECTION - A (गुण : 24)

या विभागात एकूण 48 प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नाला अर्धा गुण याप्रमाणे हा विभाग 24 गुणांचा आहे. या विभागाला 1/3 उणे गुण पद्धत लागू आहे.

1. राष्ट्रसंघाचे मुख्यालय कोठे आहे?
   a) जिनिव्हा b) व्हिएन्ना
   c) वाशिंग्टन d) न्यूयार्क

2. युनायटेड नेशन्सतर्फे अधिकृतरित्या कार्यालयीन कामांसाठी किती भाषांचा वापर केला जातो?
   a) 12
   b) 10
   c) 8
   d) 6

3. संयुक्त राष्ट्रांच्या घटनेतील दुरूस्ती किंवा बदलासाठी आमसभेत किती बहुमत आवश्यक असते?
   a) 1/3
   b) 3/4
   c) 2/3
   d) यापैकी नाही

4. संयुक्त राष्ट्रांचे सध्याचे महासचिव कोण आहेत?
   a) कोफीअन्नान b) बुद्रास घाली
   c) बान की मून d) यू यांट

5. जागतिक मानवाधिकार दिन कोणत्या दिवशी असतो?
   a) 10 डिसेंबर
   b) 1 डिसेंबर
   c) 11 डिसेंबर
   d) 10 नोव्हेंबर

6. सुरक्षा समितीत किती सदस्य आहेत?
   a) 10 b) 5
   c) 15 d) 20

7. 1948 पासून 2002 पर्यंत संयुक्त राष्ट्रातर्फे किती देशांत शांतीसैनिक मोहिमा राबविल्या गेल्या आहेत?
   a) 65 b) 63
   c) 66 d) 68

8. आंतरराष्ट्रीय व्यापाराला उत्तेजन देणे हे कोणत्या संघटनेचे ध्येय आहे?
   a) WTO b) IMF
   c) UNCTAD d) ILO

9. खालीलपैकी कोण मानवी विकास अहवाल प्रसिद्ध करते?
   a) UNESCO b) UNDP
   c) UNICEF d) UNEP

10. युरोपिय परिषदेचे मुख्यालय कुठे आहे?
   a) ब्रुसेल्स
   b) जिनिव्हा
   c) बेल्जियम
   d) व्हार्सा

11. मोस्ट फेवरर्ड नेशनचा दर्जा सदस्य राष्ट्रांना देणे हे कोणत्या संघटनेचे उद्दिष्टे आहे?
   a) NAFTA
   b) APEC
   c) PECC
   d) EU

12. भारताने कुठल्या देशाला मोस्ट फेवरर्ड नेशनचा दर्जा दिला आहे?
   a) बांग्लादेश
   b) मलेशिया
   c) पाकिस्तान
   d) चीन

13. 2013-14 सालातील चोगम (CHOGM) परिषद कुठे पार पडली?
   a) जपान b) भारत
   c) मालदिव d) श्रीलंका

14. 1995 मध्ये लष्करी उठावामुळे कोणत्या देशाचे राष्ट्रकुल सदस्य रद्द करण्यात आले?
   a) कंबोडिया b) नायजेरिया
   c) अफगाणीस्तान d) बेल्जियम

15. राष्ट्रकुल स्पर्धा किती वर्षांनी भरतात?
   a) दोन b) चार
   c) एक d) तीन

16. राष्ट्रकुल संघटनेचे प्रशासकीय प्रमुख कोण आहेत?
   a) आनंद शर्मा b) ईशांत शर्मा
   c) कमलेश शर्मा d) मोहन शर्मा

17. वेस्टफालियाचा तह कोणत्या साली झाला?
   a) 1648
   b) 1748
   c) 1948
   d) 1848

18. 'United in Diversity' हे घोषवाक्य कोणत्या संघटनेचे आहे?
a) EU b) UNICEF
c) USA d) UNESCO

19. कुपोषण व भूकबळी या समस्येत भारत कितव्या क्रमांकावर आहे?
a) 68
b) 8
c) 9
d) 65

20. भारत सरकारने कोणत्या समितीच्या शिफारशीनुसार शैक्षणिक सवाद स्थापन केला?
a) खेर समिती
b) यशपाल समिती
c) कोठारी समिती
d) राधाकृष्णन समिती

21. सर्व शिक्षा अभियान ही योजना कोणत्या पंचवार्षिक योजनेत सुरू केली?
a) दहावी
b) नववी
c) आठवी
d) सहावी

22. अनुसूचित जाती, जमाती व इतर मागासवर्गीय यांच्या शिक्षणासाठी कोणती योजना सूरू केली आहे?
a) सावित्री फुले विद्यालय योजना
b) प्राथमिक बाल विकास योजना
c) कस्तुरबा गांधी योजना
d) सर्व शिक्षा अभियान

23. सत्यशोधक समाजाची स्थापना कोणी केली?
a) राजर्षी शाहू
b) सावित्री फुले
c) डॉ. आंबेडकर
d) महात्मा फुले

24. बोडो आंदोलन कोणत्या राज्याशी संबंधित आहे?
a) नागालँड b) आसाम
c) त्रिपुरा d) मणिपूर

25. कुटुंब नियोजनावर कोणत्या पंचवार्षिक योजनेत भर देण्यात आला होता?
a) तिसऱ्या b) चौथ्या
c) पाचव्या d) सहाव्या

26. एक अपत्य धोरण कोणत्या देशाने राबविले आहे?
a) चीन
b) जपान
c) भारत
d) जर्मनी

27. मानवी संरक्षण कायदा कोणत्या वर्षी तयार करण्यात आला?
a) 1991
b) 1992
c) 1990
d) 1993

28. गुलामी प्रथेचा आंतरराष्ट्रीय पातळीवर कोणत्या परिषदेद्वारा निर्बंध घालण्यात आले?
a) ब्रुसेल्स परिषद
b) पॅरिस घोषणा पत्र
c) व्हिएन्ना परिषद
d) जिनिव्हा परिषद

29. महाराष्ट्र मध्ये लिंग गुणोत्तराचे प्रमाण कोणत्या जिल्ह्यामध्ये जास्त आहे?
a) बुलढाणा b) रत्नागिरी
c) गडचिरोली d) मुंबई

30. 'लीग ऑफ नेशन्स' मध्ये खालीलपैकी कोणता घटक समाविष्ट नाही?
a) कार्यालय b) सचिवालय
c) परिषद d) आमसभा

31. जागतिक मानवाधिकार प्रतिज्ञापत्र कोणत्या साली संयुक्त राष्ट्रसंघाच्या सनदेत समावेश करण्यात आला?
a) 1948
b) 1952
c) 1950
d) 1951

32. राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाचे अध्यक्ष कोण असतात?
a) सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त सरन्यायाधीश
b) सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश
c) उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश
d) यापैकी नाही

33. 'रिजन ऑफ नेशन्स' हा ग्रंथ कोणी लिहिला?
a) फोर्ड b) कार्टर
c) हेन्री किसिंजर d) हाबियारी माना

34. महाराष्ट्राने राज्य अल्पसंख्यांक आयोग कोणत्या वर्षी स्थापन केला?

a) 1991 b) 1995

c) 1993 d) 1992

35. राष्ट्रीय महिला आयोगाच्या सध्याच्या अध्यक्ष कोण आहेत?

a) अर्चना भागवत

b) ममता शर्मा

c) ममता बॅनर्जी

d) कार्तिकी कटटमालू

36. राज्यघटनेतील कोणत्या कलमानुसार बालमजुरी थांबविण्यासाठी तरतूद करण्यात आली आहे?

a) कलम 28

b) कलम 30

c) कलम 24

d) कलम 32

37. कायद्यानुसार 'बालक' या संकल्पनेत किती वर्षाखालील व्यक्ती बालक म्हणून गणण्यात येते?

a) 12 वर्षाखालील

b) 14 वर्षाखालील

c) 10 वर्षाखालील

d) 18 वर्षाखालील

38. 'बालसदन' ही योजना कोणत्या विभागामार्फत राबविण्यात येते?

a) समाज कल्याण b) महिला व बाल कल्याण

c) स्थायी विभाग d) यापैकी नाही

39. हुंडा प्रतिबंधक कायदा कधी अंमलात आला?

a) 1961 b) 1956

c) 1968 d) 1960

40. 'भुतिया' ही आदिवासी जमात कोणत्या राज्यात आढळते?

a) छत्तीसगड

b) नागालँड

c) महाराष्ट्र

d) उत्तरांचल

41. जोड्या लावा.

A) गुजरात	I) कोळम
B) तामिलनाडू	II) लेक्वा
C) सिक्किम	III) भिल्ल
D) आंध्रप्रदेश	IV) तोडा

a) A-IV, B,II, C-I, D-III b) B-IV, A-III, C-II, D-I

c) A-I, B-II, C-III, D-IV d) B-III, C-IV, D-II, A-I

42. मतदानाचा हक्क हा खालीलपैकी कोणत्या कलमात समाविष्ट आहे?

a) कलम 18 b) कलम 16

c) कलम 21 d) यापैकी नाही

43. 'युथ होस्टेल' महाराष्ट्र राज्यात कुठे आहे?

a) नाशिक, औरंगाबाद

b) बुलढाणा, कोल्हापुर

c) औरंगाबाद, बुलढाणा

d) कोल्हापुर, पुणे

44. स्काऊट आणि गाईड ची स्थापना कोणी केली?

a) लॉर्ड बॅडेन पॉवेल

b) लॉर्ड रिपन

c) लॉर्ड कर्झन

d) लॉर्ड लिपन

45. National Institute of Rehabilitation Training and research संस्था कोठे आहे?

a) सिंकदराबाद b) डेहराडुन

c) कटक d) नवी दिल्ली

46. अपंगांसाठी शासकीय धोरणात किती टक्के आरक्षण आहे?

a) 5% b) 3%

c) 2.5% d) 3.5%

47. जीवनावश्यक वस्तुंचा कायदा कधी तयार करण्यात आला?

a) 1954 b) 1960

c) 1956 d) 1955

48. भारतातील पुरुष साक्षरतेचे प्रमाण किती टक्के आहे?

a) 75.2% b) 86%

c) 64.8% d) 77.2%

SECTION - B (गुण : 24)

या विभागात एकूण 24 प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नाला एक गुण याप्रमाणे हा विभाग 24 गुणांचा आहे. या विभागाला उणे गुण पद्धत लागू नाही.

1. युनेस्कोची स्थापना कधी करण्यात आली?
2. UNCTAD-VIII चे संमेलन कोठे भरविण्यात आले होते?
3. UNICEF चे संपूर्ण रूप सांगा?
4. युरोपियन आयोगात एकूण किती सदस्य असतात?
5. ॲपकेची ची पहिली सभा कोठे पार पडली होती?
6. ASEAN चे पूर्ण रूप सांगा?
7. राष्ट्रकुल संघटनेचे मुख्य उद्दिष्ट कोणते?
8. 2014 च्या राष्ट्रकुल स्पर्धा कुठे झाल्या?
9. UN चे विकास दशक कधी साजरे झाले?
10. मानवी विकास अहवाल कोणत्या दोन अर्थशास्त्रज्ञांनी तयार केला?
11. आंतरराष्ट्रीय न्यायालयाचे मुख्यालय कोठे आहे?
12. PDS चे पूर्ण रूप सांगा?
13. कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायद्याचे उद्दिष्ट कोणते आहे?
14. अनाथ मुलींच्या विवाहासाठी किती अर्थसहाय्य मिळते?
15. बालवाडी पौष्टिक आहार कार्यक्रम कधी सुरू झाला?
16. 'युवा' म्हणजे किती वर्षादरम्यानची व्यक्ती होय?
17. National Institute of Mental Health and Neuro Sciences संस्था कोठे आहे?
18. जिल्हा ग्रामीण विकास योजनेत लाभार्थीचे किमान वर्षे असावे?
19. AFSPA (ॲस्पा) चे पूर्ण रूप सांगा?
20. भारतात सर्वाधिक बालमजुर कोणत्या राज्यात आहेत?
21. भारतीय राज्यघटनेचे कलम 15 यात कोणती तरतूद आहे?
22. महाराष्ट्रात किती जिल्ह्यात आदिवासी जमातीचे वास्तव्य आहे?
23. न्युक्लिअर बजेट योजना कधी सुरू करण्यात आली?
24. 60 युनिट वीज कोणत्या योजनेद्वारा आदिवासी कुटुंबास मोफत दिली जाते?

SECTION - C (गुण : 32)

या विभागत एकूण 4 **प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नाला** 8 **गुण याप्रमाणे हा विभाग** 32 **गुणांचा आहे. या विभागाला उणे गुण पद्धत लागू नाही.**

टीपा लिहा.

1. किमान आधारभुत किंमत म्हणजे काय?

2. रचनात्मक बेरोजगारी म्हणजे काय?

3. समान कृषी धोरण.

4. स्थलांतरित शेती.